श्री दत्त पॉलीटेक्निक कॉलेज, दत्तनगर.
पोस्ट : दत्तनगर, ता.शिरोळ जि.कोल्हापूर

फोन : (०२३२२) २३०३१७, २२६५५१ ते ५६ ई-मेल :- dattapoly@gmail.com

दि. १४/०८/२०२०

# :: नोटीस ::

**(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता Carry forward विद्यार्थ्यांचे Registration करणेबाबत )**

श्री दत्त पॉलीटेक्निक कॉलेजकडील अंतिम सत्र वगळून सर्व विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या जा. क्र. मरातंशिमं/का-४३/शै.व.२०२०-२१/२०२०/०५२ दि. १३/०८/२०२० च्या पत्रानुसार ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा - २०२० करीताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयाकडून निश्चित केलेले असून **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पुढील सत्र / वर्ष प्रवेशाकरीता RG4C नुसार पात्र नसतील** अशा सर्व विद्यार्थ्यांना **"Carry forward"** च्या योजनेअंतर्गत पुढील सत्र / वर्षामध्ये प्रवेश देण्यात यावा व संस्थेकडे प्रवेश निश्चित करुन विहीत मुदतीत नोंदणी (Registration) करुन घेणेबाबत कळविणेत आलेले आहे. **Carry forward द्वारे प्रवेश करण्याची संधी फक्त शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता राहील.**

तरी **"Carry forward"** योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांनी संस्थेकडे प्रवेश निश्चित करुन दि. १७/०८/२०२० ते २१/०८/२०२० अखेर नोंदणी (Registration) करुन घेणेची आहे तसेच सदर मुदतीनंतर आलेल्या विद्यार्थ्यांच्या नोंदणी (Registration) अर्जांचा विचार केला जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. यासंदर्भात आपल्या विभागाकडील विभागप्रमुख व ऑफिसकडील राऊत एस.जी. यांचेशी संपर्क साधणेचा आहे.

**प्राचार्य**
**श्री दत्त पॉलीटेक्निक कॉलेज दत्तनगर**
**शिरोळ**

**प्रत - सर्व विभागप्रमुख**

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२११०/१८८/१३२

Email: secretary@msbte.com Web : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४३/शै.व.२०२०-२१/२०२०/1092 दिनांक 13 AUG 2020

**परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित संस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता Carry Forward विद्यार्थ्यांचे Registration करणेबाबत..**

संदर्भ: मंडळाचे महत्त्वाचे परीपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/उन्हाळी परिक्षा२०२०/८३, दि. १५/०५/२०२०

कोव्हीड-१९ च्या उद्रेकामुळे उद्भवलेल्या परिस्थितीनुसार उपरोक्त संदर्भीय परिपत्रकात नमूद मुद्दा क्र. ५ नुसार उन्हाळी परीक्षा-२०२० अंतिम सत्र/ वर्ष वगळून नियमित विद्यार्थ्यांचे निकाल १४ जुलै, २०२० रोजी जाहीर झाले असून या निकालानंतर जे विद्यार्थी मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG4C नुसार पात्र असतील अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेश देण्यात यावा. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परिक्षा २०२० करिताचे परिक्षा अर्ज विभागीय कार्यालयाकडून निश्चित केलेले असून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता पुढील सत्र / वर्ष प्रवेशाकरिता RG4C नुसार पात्र नसतील अशा सर्व विद्यार्थ्यांना "Carry Forward" च्या योजनेअंतर्गत पुढील सत्र / वर्षामध्ये प्रवेश देण्यात यावा. Carry Forward द्वारे प्रवेश करण्याची संधी फक्त शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता राहील.

**Carry forward योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची नोंदणी करणेबाबत कार्यप्रणाली-**

१) Carry forward योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची यादी Institute Login (२०२०-२१) मध्ये Carry forward Registration अंतर्गत सत्र / वर्ष व अभ्यासक्रम निहाय उपलब्ध असेल.

२) संस्थेने ज्या Carry forward विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित केला असेल अशा विद्यार्थ्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे.

३) सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण झाल्यावर Confirm केलेल्या सत्र / वर्ष निहाय यादीवर प्राचार्यांची स्वाक्षरी घेऊन संस्थास्तरावर Print जतन करावी.

४) सर्व सत्र/ वर्ष निहाय यादी Confirm झाल्यावर Undertaking Confirm करावे. संस्थेस Undertaking Confirm केल्यानंतर विद्यार्थी नोंदणी यादी मध्ये बदल करता येणार नाही.

५) Undertaking Confirm झाल्यावर त्याची Print Copy घेऊन प्राचार्यांनी स्वाक्षरी केलेली प्रत उपलब्ध लिंकद्वारे Upload करावी.

६) संस्थांनी Undertaking ची प्रत Upload केल्यानंतर विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून Carry forward विद्यार्थ्यांची नोंदणी निश्चित करावी.

७) संस्थांनी Undertaking ची प्रत Upload न केल्यास विभागीय कार्यालयास Carry Forward विद्यार्थ्यांची नोंदणी निश्चित करता येणार नाही, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

**Carry forward विद्यार्थ्यांचे Registration करणेबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे-**

| अ.क्र. | प्रकिया | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | Carry forward विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय संस्थेमार्फत Registration करणे. | १७/०८/२०२० ते २१/०८/२०२० |
| ०२ | सर्व Carry forward प्रवेशित विद्यार्थ्यांचे Registration पुर्ण झाल्यावर प्राचार्यांची स्वाक्षरी असलेली Udertaking ची प्रत Institute Login मध्ये उपलब्ध असलेल्या लिंकद्वारे अपलोड करून विभागीय कार्यालयाशी संपर्क करावा व Registered carry forward विद्यार्थी निश्चित करुन घ्यावेत. | २०/०८/२०२० ते २५/०८/२०२० |

विभागीय कार्यालयाकडुन निश्चित करण्यात आलेल्या Carry forward विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता पुढील सत्र/वर्ष करिता नियमित परिक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील. याबाबत संस्था स्तरावर काही अडचण असल्यास Message System द्वारे मंडळास कळवावे. विहीत कालावधित Carry Forward विद्यार्थ्यांचे Registration न झाल्यास त्यास संबंधित संस्था जबाबदार राहील, याची नोंद घेण्यात यावी.

(वि. र. जाधव)
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत :

उपसचिव, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद यांना कळविण्यात येते की, संस्थांनी Carry forward विद्यार्थ्यांच्या Registration ची प्रत अपलोड केल्यावर आपल्या स्तरावर त्याचे Final Confirmation करावे.